कायम विना अनुदान तत्त्वावर
(मराठी,इंग्रजी, हिंदी, उर्दू , तामिळ इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/८४८/२०१२
पुणे १ दिनांकः- ०७/११/२०१२

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
श्री. फिरंगाईमाता इंग्लिश मिडीयम स्कूल,
कुरकुंभ ता. दौंड जि.पुणे.

**विषयः-** कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा / **नैसर्गिक वाढीचा** /वाढीच्या प्राथम/ जादा तुकडया /वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस १००२/(१०००/०२)/प्राशि -३ दि.१४ जानेवारी २००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या **नैसर्गिक वाढीचा** /जादा तुकडया /वर्ग सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. फिरंगाईमाता इंग्लिश मिडीयम स्कूल कुरकुंभ ता. दौंड जि.पुणे. | इंग्रजी | इ. २ री ते इ.४ थी | - | नैसर्गिक वाढ | कायम विना अनुदान तत्वावर मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**
**सचिव / अध्यक्ष :- श्री. फिरंगाईमाता इंग्लिश मिडीयम स्कूल कुरकुंभ ता. दौंड जि.पुणे.**
**मुख्याध्यापक :- श्री. फिरंगाईमाता इंग्लिश मिडीयम स्कूल कुरकुंभ ता. दौंड जि.पुणे.**